नाशिक जिल्हा परिषद नाशिक सामान्य प्रशासन विभाग, दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५९१०१०

जाक्र/साप्रवि/आस्था-३/१५९६/२०१७
नाशिक दिनांक:- ०३/०७/२०१७

प्रति,

१) खाते प्रमुख ----------------(सर्व)
जिल्हा परिषद, नाशिक

विषय :- जिल्हा परिषद गट क व गट ड अंतर्गत मागासवर्गीय आरक्षणातुन नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांनी अद्याप जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेल्या प्रकरणी विहीत कालमर्यादेत कार्यवाही करणे बाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२०००
२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब दिनांक १८/५/२०१३
३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१५/प्र.क्र.२७६-अ/१५/१६-ब दिनांक २१/१०/२०१५

उपरोक्त संदर्भीय शासनाचे अधिनियम व शासन निर्णय याकडे आपले विषेश लक्ष वेधण्यात येत आहे. वरील शासन निर्णयाच्या प्रती आपणाकडेस उपलब्ध आहे त्याचे काळजीपूर्वक आपण व आपले विभागातील सहा.प्रशासन अधिकारी, कनि. प्रशासन अधिकारी यांनी अवलोकन करावे.

दिनांक १५ जुन,१९९५ नंतर दिनांक १७/१०/२००१ पर्यंत या कालावधीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्याप पर्यंत सादर केलेले नाही अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेतुन निलंबित करण्यात येऊ नये अथवा त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येऊ नये असे निर्देश आहे. याचाच अर्थ दिनांक १५ जुन, १९९५ ते १७/१०/२००१ या कालावधीत नियुक्त झालेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना तात्पुरते सेवेत संरक्षण आहे. परंतु दिनांक १८/१०/२००१ नंतर मागासवर्गीय आरक्षणातर्गत नियुक्ती झालेले परंतु अद्याप जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांना सदरचे संरक्षण लागु नाही.

आपले विभागाचे अधिनस्त दिनांक १८/१०/२००१ नंतर नियुक्त झालेल्या मागासवर्गीय आरक्षणातर्गत ज्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र (Cast Verification Certificate) अद्याप सादर केलेले नाही. अशा संबंधीत कर्मचाऱ्यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस देवुन जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १ महिन्याची संधी देण्यात यावी. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना यापुर्वीच अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावले नंतर संधी देवुनही जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही. अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा संपुष्टात आणणे संबंधीचे कार्यवाही संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदीच्या अनुषंगाने ७ दिवसात प्रस्तावित करावी.

वरील प्रकरणी प्रत्येक विभागाने अंत्यत गंभीरपणे दखल घेऊन कार्यवाही करावी. भविष्यात या प्रकरणी अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत कार्यालय प्रमुखास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३/०७

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नाशिक

Scanned by CamScanner